# प्रेस नोट

ला. प्र. वि परभणी
दि.१५/०८/२०२६

| अ.क्र. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| १ | घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी |
| २ | तक्रारदार | वय ७० वर्षे / पुरूष |
| ३ | आरोपी | रमेश त्रंबकराव लटपटे, वय ४८ वर्षे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), नेणुक साझा पडेगाव, ता.गंगाखेड, जि. परभणी, अतिरिक्त पदभार साझा झोला, तहसील कार्यालय गंगाखेड, जि. परभणी, राहणार कोद्री, ता. गंगाखेड, जि. परभणी. |
| ४ | तक्रार | दि. १०/०८/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, मी शेतकरी असुन माझे वडीलांचे निधन झाल्यामुळे मी व माझा भाऊ असे दोघांनी वाटणीपत्र तयार करून घेतले आहे. सदर वाटणीपत्रानुसार फेर ओढण्यासाठी दि. ०९.०७.२०२६ रोजी तलाठी साहेबांना जुने तहसील कार्यालय गंगाखेड येथे जावून भेट घेतली. तलाठी यांनी बॉण्डवरील वाटणी पत्रानुसार फेर ओढण्यासाठी २५,०००/—रूपयांची मागणी केली. तक्रारदार यांचेकडे ५,०००/— रूपये आहेत असे म्हटल्यावर तलाठी यांनी तुम्ही तहसील मध्ये अर्ज देवून परत माझेकडे या असे म्हणाले. त्यानंतर दि. १३.०७.२०२६ रोजी तहसील कार्यालयात अर्ज दाखल केला. दि. १०.०८.२०२६ रोजी तक्रारदार यांना भेटणार असल्याने व तलाठी यांनी पैशांची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी म्हणुन तक्रारदार यांनी तक्रार दिली होती. |
| ५ | तक्रारची पडताळणी | तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पंचासमक्ष दि. ११/०८/२०२६ रोजी जुने तहसील कार्यालय गंगाखेड येथे पडताळणी केली असता नमुद **तलाठी रमेश लटपटे** यांनी पंच क्रमांक १ यांचे समक्ष तक्रारदार यांच्या फेर ओढण्यास तक्रारदारास २०,०००/—रूपये लाचेची मागणी केली. |
| ६ | सापळा कार्यवाही | तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची दि.११/०८/२०२६ रोजी जुने तहसील कार्यालय गंगाखेड येथे पंचासमक्ष पडताळणी केली असता नमुद तलाठी रमेश लटपटे नेमणुक सज्जा पडेगाव ता. गंगाखेड अतिरिक्त पदभार साझा झोला, तहसील कार्यालय गंगाखेड, यांनी तक्रारदार यांना फेर नोंदविण्याकरीता २०,०००/— रूपयांची मागणी केली. त्यावेळेस ती तक्रारदारास अर्ध्या तासात घेवून येण्यास सांगितले. अर्ध्या तास होवून गेल्याने तक्रारदार यांनी पंचासमक्ष फोन केला असता तलाठी लटपटे यांनी ते बाहेर गेले असून ते भेटू शकत नाहीत. मी जेंव्हा कळवेल त्यावेळेस तुम्ही मला येवून भेटा आणि येताना तहसील कार्यालयाचे आवक जावक विभागात दिलेला अर्ज व बॉन्ड पेपर सोबत घेवून येण्यास सांगीतले. त्यामुळे तक्रारदार यांनी पंचासमक्ष केलेल्या विनंती नुसार सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.<br>दि. १३.०८.२०२६ रोजी सापळा कार्यवाही अनुषंगाने तक्रारदार यांची दोन्ही पंचासमक्ष भेट घेतली असता तक्रारदार यांनी सांगीतले की, तलाठी लटपटे यांना माझा संशय आला आहे. ते माझेकडुन मागणी केल्याप्रमाणे २०,०००/— रूपये लाच स्विकारनार नाहीत याची मला खात्री झालेली आहे. यापुढे लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात यावी असे तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगीतले.<br>त्यावरून **तलाठी रमेश लटपटे** यांनी २०,०००/—रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| ७ | गुन्हा रजिस्टर नं. /कलम/पोलीस स्टेशन/ जिल्हा, दिनांक व वेळ | **पोलीस स्टेशन गंगाखेड जि.परभणी गु.र.नं ५५६/२०२६ येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध** अधिनियम १९८८ प्रमाणे दि.१५/०८/२०२६ चे १९.०५ वा. स्टे.डा. नोंद क्र. २९. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| ८ | आरोपी अटक दि. व वेळ | पाहिजे आरोपी अटक करणे बाकी. |
| ९ | सापळा अधिकारी | श्रीमती मनिषा पवार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., परभणी. |
| १० | पर्यवेक्षक अधिकारी | श्री. महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. परभणी. |
| ११ | सापळा पथक | सपोउपनि/निलपत्रेवार, मपोह/सिमा चाटे, पोकॉ/नागरगोजे, घुले, बोधनकर, शेख जिब्राईल, चापोकॉ/नरवाडे. |
| १२ | मार्गदर्शन | मा.श्री.श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि नांदेड परिक्षेत्र नांदेड. मो.९२२६४८४६९९<br>मा.श्रीमती डॉ.आश्विनी जगताप, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि नांदेड परिक्षेत्र नांदेड. |

१३. लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरूध्द तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | लाप्रवि मुख्यालय |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| पत्ता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी शनिवार बाजार, नानलपेठ परभणी.पिन कोड ४३१४०१. | मा.पोलीस अधीक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र नांदेड, स्नेह नगर पोलीस वसाहत, गेट क. १ नांदेड. ४३१६०५. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई. सर पोचखानवाला मार्ग, वरळी मुंबई–४०००३०. |
| दुरध्वनी कमांक,<br>व्हॉटसअप कं.<br>टोल फ्री | दुरध्वनी कमांक ०२४५२–२२०५९७,<br>व्हॉटसअप कं.– ९२७२१११०६४<br>टोल फ्री कं. – १०६४ | दुरध्वनी कमांक<br>०२४६२–२५५८११ | ०२२–२४९२१२१२. |
| ई – मेल आयडी | dyspacbparbhani@mahapolice.gov.in | spacbnanded@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी